# प्रेस नोट

| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
|---|---|---|
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे विमानतळ जि.नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | गु.र.नं. २७५/२०२६ कलम ७ भ्र.प्र.अ. १९८८ अन्वये |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय ६० वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | श्री. मिलिंदराज शामराव दवणे, वय ३७ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद ग्रामपंचायत अधिकारी, नेमणूक ग्रामपंचायत पांगरी पहाड, तालुका किनवट, जिल्हा नांदेड रा. दिपक नगर तरोडा बुद्रुक नांदेड |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक १३.०६.२०२६ रोजी १२.३७ ते १९.१५ वाजता शिवमंदीर समोर रणविर आर्ट दुकानामध्ये नांदेड |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक १४.०६.२०२६ रोजी ०६.१० वाजता स्टे.डा ०९ वर |
| 8 | मागणी केलेली रक्कम | ५०,०००/- रुपये मागणी करुन तडजोडीअंती ४०,०००/- रुपये स्विकारले |
| 9 | स्विकारलेली रक्कम | स्कॅनरव्दारे १५०००/- व २५०००/- रुपये नगदी असे एकुण ४००००/- रुपये स्विकारली आहे. |

10 **थोडक्यात माहिती -**

दिनांक ११/०६/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, ते शासकीय गुत्तेदार असून त्यांनी जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत ग्रामपंचायत पांगर पहाड तालुका किनवट जिल्हा नांदेड येथील संत सेवालाल महाराज सांस्कृतिक सभागृहाचे दहा लक्ष रुपयाचे शासकीय गुत्तेदार म्हणून बांधकामाचे काम केले आहे. सदर बांधकामाचे बिल दहा लक्ष रुपये पैकी दिनांक २७/०५/२०२६ रोजी आरोपी लोकसेवक दवणे यांनी ९,००,१२८/- रुपयाचा चेक दिला व उर्वरित रक्कम देण्यासाठी दहा लक्ष रुपयाचे पाच टक्के प्रमाणे लाचेची मागणी केली आहे, अशा मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी दिली.

दिनांक १३/०६/२०२६ रोजी तक्रारदार हे शासकीय पंचासह आरोपीची भेट घेण्यासाठी आरोपीस कॉल केला असता, त्यांनी चैतन्यनगर नांदेड येथील रणवीर आर्ट या दुकानावर बोलाविले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे उर्वरित राहिलेले एक लाख रुपयाचे चेक देण्यासाठी आरोपी लोकसेवक ग्रामपंचायत अधिकारी दवणे यांना शासकीय पंचा समक्ष विनंती केली असता त्यांनी दहा लक्ष रुपयाचे पाच टक्के प्रमाणे प्रथम ५०,०००/- रुपये व तडजोडीअंती ४०,०००/- रुपये लाच स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानंतर दि. १३/०६/२०२६ रोजी तक्रारदार यांना शासकीय पंचासह आरोपी लोकसेवक ग्रामपंचायत अधिकारी दवणे यांना कॉल करून सध्याला त्यांचे कडे २५,०००/- रुपये असून उर्वरित १५०००/- रुपये सोमवारी बँक सुरू झाल्यानंतर विड्रॉल करून देतो असे सांगितले. त्यावेळी आरोपी लोकसेवक दवणे यांनी समक्ष भेटून चर्चा करू असे म्हणून तक्रारदार यांना चैतन्यनगर नांदेड येथील रणवीर आर्ट या दुकानावर बोलावून घेतले. तेव्हा लोकसेवक दवणे यांनी सध्याला २५,०००/- रुपये तर घेऊन या नंतर बघू असे म्हणाले.

दिनांक १३/०६/२०२६ रोजी तक्रारदार हे शासकीय पंचासह लाचेची रक्कम २५०००/- रुपये घेऊन आरोपी लोकसेवक ग्रामपंचायत अधिकारी दवणे यांची भेट घेण्यासाठी चैतन्यनगर, नांदेड येथे गेले असता आरोपी लोकसेवक ग्रामपंचायत अधिकारी दवणे यांनी तक्रारदार यांना रणवीर आर्ट या दुकानावर बोलावून त्यांचे कडील २५,०००/- रुपये लाचेची रक्कम शासकीय पंचायत समक्ष दुकानातील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवण्यास सांगितले व उर्वरित १५०००/- रुपये रणवीर आर्ट येथील स्कॅनर वर ऑनलाईन टाकले तर तुम्हाला लगेच चेक देतो असे म्हणून तक्रारदार यांना १५०००/- रुपये ऑनलाईन करण्यास भाग पाडले. तक्रारदार यांनी रणवीर आर्ट या दुकानातील स्कॅनरवर १५,०००/- रुपये ऑनलाईन टाकले असता आरोपी लोकसेवक ग्रामसेवक यांनी लगेच तक्रारदार यांना चेक लिहून त्यावर त्यांची स्वाक्षरी करून त्यांच्या जवळील ग्रामपंचायत अधिकारी,पांगरी पहाड चा शिक्का मारून चेक दिले आहे. आरोपी ताब्यात घेतला असुन पोस्टे विमानतळ गुरनं २७५/२०२६ कलम ७ भ्रप्रअ १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची सापळा कारवाई मा. श्री. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक राहुल तरकसे, पोलीस निरीक्षक श्रीमती अनिता दिनकर व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) श्री. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक - ०२४६२ - २५५८११, मो.नं. ९८२३४१०५०६
२) श्री राहुल तरकसे, पोलीस उप अधीक्षक - मो.नं. ८४११८०८३२८
३) टोल फ्रि - १०६४
४) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक - ०२४६२ - २५३५१२
५) **Website** - **www.acbmaharashtra.gov.in**
६) **Mobile App** - **www.acbmaharashtra.net**
७) **Facebook Page** - **www.facebook.com/maharashtraACB**
८) **Twitter** - **@ACBnanded**
९) **Instagram** - **acb_nanded**
१०) **Youtube Cahnnel** - **@AntiCorruptionBureauNanded**
११) **whats App number** - ८९५६५०१०६४

पोलीस उप अधीक्षक
ला.प्र.विभाग,नांदेड युनिट